# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 14/12/2023 (गुरूवार) दुपार

---

## जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

**पो.स्टे. खापा** :– अंतर्गत अर्धा किमी अंतरावर मौजा जवाहर टी पाईन्ट खापा येथे पोलीस स्टेशन खापा येथील स्टाफ नाकाबंदी करीत असता मुखबीरव्दारे खबर मिळाली की एम.पी. येथुन खापा मार्ग नागपुर येथे जनावरांची कत्तलीकरीता एका पांढऱ्या रंगाचे महीन्द्रा बोलेरो पिकअप मध्ये जनावरांची वाहतुक करुन घेवुन जाणार आहे. अशा माहीती वरुन जवाहर टी पॉईट येथे नाकाबंदी दरम्यान येणारे जाणारे वाहन चेक करीत असता दिनांक १३/१२/२०२३ चे ०४/३० वा. दरम्यान एक पांढऱ्या रंगाचे महींद्रा बोलेरो येतांना दिसले तेव्हा सदर वाहनाला हात देवुन थांबवुन सदर वाहन चालक यास त्याचे नाव पत्ता विचारले असता त्याने आपले नाव नकुल शिवप्रसाद आठणकर वय २० वर्ष रा. बिच्छवा जि. छिंदवाडा असे सांगीतले वरुन सदर वाहनाची पाहणी केली असता सदर वाहन क्र एम. एच.–४०/ सी. एम. –५७६१ असे दिसुन आल्याने सदर मालवाहु वाहनाचे मागचे डाल्याची पाहणी केली असता डाल्यामध्ये ६ लहान काळया रंगाचे हेले व २ लहान काळया रंगाचे वघार मादा असे डाल्यामध्ये ८ जनावरे प्रत्येकी ७०००/– रुपये असे ५६,०००/– रू चे मुद्देमाल सदर ०८ जनावरे वाहतुकीचे वापरात आणलेली रंगाचे महीन्द्रा बोलेरो वाहन एम.एच. ४० सी.एम. ५७६१ कींमती २,५०,०००/– रू असा एकुण ३,०६,०००/–रू चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी सरकार तर्फे फिर्यादी नामे– पोशी पन्नालाल बटाउवाले पोस्टे खापा यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. खापा येथे वरील आरोपीविरुध्द कलम ११(१) (ब) (ड) (च) (छ) प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधीनियम १९६० सहकलम ५ (अ),९ महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधीनियम १९९५ काद्ययान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा /१९५९ विशाल महालकर पोस्टे खापा हे करीत आहे.

## घरफोडीचा प्रयत्न

**पो.स्टे. पारशिवनी** :– अंतर्गत ०१ किमी अंतरावर मौजा परमात्मा एक आश्रम दत्तटेकडी पारशिवनी येथे दिनांक १२/१२/२०२३ चे २०.३० वा. दिनांक १३/१२/२०२३ चे ०६.४५ वा. दरम्यान फिर्यादी नामे– पंकज मधुकरजी बिसन, वय ३९ वर्ष, रा. पारशिवनी वार्ड क्र. ६ बारईपुरा यांच्या परमात्मा एक आश्रमच्या चॅनल गेटला व त्याचे बाजुला असलेल्या लाकडी दरवाज्याला लावलेले कुलुप कोणीतरी अज्ञात चोराने चोरी करण्याचे इरादयाने तोडण्याचा प्रयत्न केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. पारशिवनी येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८०, ५११ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर अज्ञात आरोपीचा शोध सुरू असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार रामराव पवार मो. नं. ७८७५९८३३६० हे करीत आहे.

. **विनयभंग**

**पो.स्टे. नरखेड** :— यातील फिर्यादी ही शिक्षिका आहे यातील **आरोपी नामे— पितांबर नारायण गायधणे रा. नरखेड** हा त्याच शाळेतील मुख्याध्यापक आहे, फिर्यादी ही आरोपी याचेकडे सुट्टीचा अर्ज दयायला गेली असता आरोपी यांनी फिर्यादी यास शिवीगाळ करण्यास सुरूवात केली आणि ऑफीसच्या बाहेर जा व अश्लील भाषेत शिवीगाळ करून तुझी नौकरी करण्याची लायकी नाही जानसे मारून टाकीन साली आई बहिनीची शिवीगाळ केली व फिर्यादी यांचेकडे पाहुन अश्लील चाळे करतो, बाहेर गेले असता मुताला गेली हगाला गेली असा बोलतो व मागील दोन वर्षापासुन शरीर सुखाची मागणी करीत आहे असा आरोपी यांचा फिर्यादी यास शारीरिक व मानसिक त्रास असल्याने फिर्यादी हिने पोलीस स्टेशन नरखेडला येवुन लेखी व तोंडी रिपोर्ट वरून सदर गुन्हा नोंद करून तपासात घेतला.

. सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. नरखेड येथे आरोपीविरुध्द कलम ३५४ (अ), ५०९, २९४, ५०६ भादंवी कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास महिला पोलीस उपनिरीक्षक सारीका गुरूकर पोस्टे नरखेड मो. नं. ९६६५८३४९९९ या करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**